# महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा वैद्यकीय अधिकारी गट-अ (एस-२०)

# पदभरती २०२४

## एमबीबीएस (MBBS) उमेदवारांसाठी प्रसिध्दी पत्रक

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी (एस-२०) (एमबीबीएस) जाहिरात दि.३१.०१.२०२४ मधील १४४६ पैकी रिक्त असलेल्या पदांवर प्रतिक्षाधीन यादीतील उमेदवारांसाठी दि.२३.०७.२०२५, रोजी समुपदेशन प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. सदर समुदपदेशन प्रकियेबाबत माहिती खालीलप्रमाणे -

१. सन २०२४ च्या वैद्यकीय अधिकारी गट-अ पदभरतीतील प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना दि.२३.०७.२०२५ रोजी समुपदेशनासाठी आरोग्य भवन, मुंबई येथे बोलाविण्यात येईल.
२. एकूण ३५ रिक्त पदांसाठी एकास पाच याप्रमाणे उमेदवारांना समुपदेशन प्रक्रियेसाठी बोलविण्यात येत आहे. गुणवत्ता यादी मधील गुणवत्ता क्रमांकानुसार पात्र होणा-या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येतील याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.
३. कागदपत्र पडताळणी ही समुपदेशनाच्याच दिवशी करण्यात येणार असून उमेदवारांने ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत तसेच अपलोड केलेली सर्व मूळ कागदपत्रे व त्यांचा प्रत्येकी १ साक्षांकीत केलेली छायांकीत प्रत, १ पासपोर्ट साईज फोटो, व मुळ आधारकार्ड समुपदेशनाच्या वेळी सोबत आणणे अनिवार्य आहे.
४. उमेदवारांनी ते सार्वजनिक आरोग्य विभागातील कुठल्याही पदावर कार्यरत नसलेबाबत त्यांना शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.
५. पदव्युत्तर पदवी/पदविका धारक उमेदवार यांना त्यांच्या एमबीबीएस च्या गुणवत्ता यादी मधील गुणवत्ता क्रमांकानुसार समुपदेशनासाठी बोलविण्यात येईल, तथापि एम.बी.बी.एस. च्या गुणवत्तेनुसार उमेदवारांस पदस्थापना न मिळाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.
६. समुपदेशनाबाबत ज्या उमेदवारांना ई-मेल व दूरध्वनी संदेश प्राप्त होतील अशाच उमेदवारांनी दि.२३.०७.२०२५ रोजी समुपदेशन प्रक्रियेसाठी उपस्थित रहावे, अन्य उमेदवारांनी उपस्थित राहू नये. त्यांचा विचार केला जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

-------------------------------